**प्रेस नोट** दिनांक - २०/०७/२०२६

## मुंबई गुन्हे शाखेची मोठी कारवाई

**अवैधरित्या भारतात वास्तव्यास असलेल्या ३७ बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले बाबत...**

मुंबई शहरात अवैधरित्या वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांविरुध्द सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मुंबई पोलीस गुन्हे शाखेच्या गुन्हे प्रकटीकरण-१ अंतर्गत कक्षांनी अवैधरीत्या स्थलांतरीतां विरूध्द राबविण्यात आलेल्या मोहिमेदरम्यान मुंबईत अवैधरित्या वास्तव्यास असलेल्या ३७ बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले आहे. सदर बांगलादेशी नागरीक मुंबईत कोणत्याही वैध प्रवास अथवा वास्तव्यासाठी आवश्यक कागदपत्रांशिवाय राहत असल्याचे प्राथमिक तपसात निष्पन्न झाले आहे.

सदर कारवाई दरम्याण संबंधित व्यक्तींची ओळख, नागरिकत्व, भारतात प्रवेश करण्याची पध्दत तसेच वास्तव्यासाठी वापरण्यात आलेली कागदपत्रे यांची पडताळणी करण्याआली आहे. आवश्यक कारवाई पूर्ण झाल्यानंतर मिळुन आलेले बांग्लादेशी नागरीकांना त्यांच्या मुळ देशात परत पाठविण्याबाबतची कायदेशीर (Deportation) प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे.

मुंबई पोलीसदला मार्फत अवैधरीत्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरीकांविरुध्द सातत्याने मोहीम राबविण्यात येत असुन अशा कारवाया अधिक प्रभाविपणे करण्यात येत आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात अवैधरीत्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांची माहिती जवळच्या पोलीस ठाण्यास अथवा मुंबई पोलीस नियंत्रण कक्षास दयावी असे आवाहन करण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त( गुन्हे ) श्री अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त ( गुन्हे ) श्री कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त ( प्रकटीकरण-१ ) श्री. नवनाथ ढवळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ( प्र - उत्तर) श्री. रविंद्र अडाणे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ( प्र - पूर्व) श्री. धर्मपाल बनसोडे मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ( प्र - पश्चिम) श्री. विनायक चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत जगदाळे , वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संदिप येडे-पाटील , कक्ष ६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. भरत घोणे, कक्ष ९ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. सचिन पुरानिक यांनी तसेच कक्षाच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या पथकांनी नियोजनबध्द रित्यापार पाडली असुन पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.